# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१५/०३/२०१९

## दि.१४/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २२६/१९,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | सौ.मीनाक्षी बाळासाहेब वनशिव,वय-५० वर्षे,रा.न-हे गाव,पुणे |
| **आरोपी** | पांढरे रंगाचे कारमधील एक संशईत इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०३/२०१९ रोजी सकाळी ०५/३० वा. ओमकार लॉजचे अलीकडे सर्व्हिस रोड,मुबंई-बंगलोर हायवे लगत आंबेगाव-खुर्द,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती बाळासाहेब सोपान वनशिव,वय-५२ वर्षे,रा.सोपान स्मृती बिल्डिंग, अमर मेडीकल समोर,न-हे गाव,पुणे हे त्यांचा मित्र प्रकाश बाबुराव टिळेकर याचेसह पायी फिरण्यासाठी गेले असताना,यातील नमुद संशईत इसमाने कार मधुन येवुन सर्व्हिस रोडने दोन ते तीन वेळा संशयितरित्या फिरुन, बाळासाहेब वनशिव व प्रकाश टिळेकर हे व्यायाम करुन सर्व्हिसरोडच्या कडेने कठड्या लगत डावे बाजुने पायी घराकडे येत असताना,कार चालकाने पाठीमागुन जोरात येवुन बाळासाहेब यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने जोरात धडक देवून त्यांना गंभीर जखमी केले आहे. बाळासाहेब वनशिव व संशईत इसम यांचेमध्ये शेत जमिनीवरुन वाद होता. तसेच फिर्यादी व संशईत इसमाची पत्नी ही न-हे ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे निवडणुकीमध्ये उभे असताना,ती पराभुत होवुन,फिर्यादी हया सरपंच म्हणुन निवडुन आल्या होत्या. त्यांचा राग मनात धरुन सदर इसमाने फिर्यादी व त्यांचे पती यांना बघुन घेण्याची धमकी दिली होती. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेद्र पाटील ९७०२९७९०९० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २०८/१९,भादविक २७९,३३७,३३८,४२७,मोटार वाहन अधिनिम कलम १३२ (१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | मंजुसिंग रजपुत,वय-३८ वर्षे,रा.पंचशिल नगर,पिंपळे-निलख,पुणे |
| **आरोपी** | ट्रॅक्टर क्र.एमएच/१२/जेएन/२९४४ हिचेवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०३/२०१९ रोजी २१/४५ वा.ते १०/०० वा.चे दरम्यान सोमेश्वरवाडी जवळ,पाषाण,बाणेर लिंक रोडवर,पाषाण,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील रिक्षा मध्ये कुटुंबासह पाषाण,बाणेर लिंक रोडने जात असताना,यातील नमुद ट्रॅकरवरील चालकाने फिर्यादी यांचे समोरुन त्याचे वाहन हे भरधाव वेगात व बेदरकारपणे चालवुन,फिर्यादी यांचे रिक्षास जोरात धडक दिल्याने रिक्षा मधील फिर्यादी हे स्वतः १.अंबिका मंजुसिंग रजपुत २.पवन मंजुसिंग रजपूत ३.अंजली मुजुसिंग रजपुत,सर्व रा.पंचशिल नगर,पिंपळे-निलख,पुणे यांना किरकोळ व गंभीर जखमी करण्यास कारणीभुत होवुन,सदर ट्रॅक्टर चालक याने बाजुचे पत्र्याचे घरावर त्याचा ट्रॅक्टर घालुन घराचेही नुकसान करुन घटनास्थळावरून पळुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ठेंगे ८४८३०३८९५३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २४१/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्र.का.क.४३(अ)(ब)(क),६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४०,रा.उंड्री,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी ११/५६ ते दि.०८/०३/२०१९ रात्रौ १२/०४ कॅम्प,पुणे येथील शाखेतील बँक मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी याचे कॅम्प,पुणे येथील शाखेतील बँकचे खात्यामधुन सदर बँकेचे बनावट ए.टी.एम.कार्ड तयार करून, फिर्यादी यांचे परवानगीशिवाय त्यांचे खात्या मधुन ४०,०००/- रूपये रक्कम काढुन घेवुन,त्यांची फसवुणक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अनिल पाटील ९९२३७८६९९९ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १२७/१९,भादविक ४१९,४४३,४६५,४७१,३४,महाराष्ट्र पोलीस अॅक्ट कलम १२० |
| **फिर्यादी** | मनोज राममुर्ती,वय-४३ वर्षे, निरीक्षक,सी.आय.एस.एफ,पुणे |
| **आरोपी** | १.सुधीर बाळकृष्ण शिंदे,वय-४० वर्षे,धंदा-ड्रायव्हर,रा.किरकटवाडी,खडकवासला,पुणे २.सुमित दिलीप मालुसरे,वय-२८,रा.१९९,सोमवार पेठ,सम्यग चेंबर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०३/२०१९ रोजी १६/४० वा.पुणे-लोहगाव नागरी विमानतळचे प्रस्थान गेट नं.२ येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुधीर बाळकृष्ण शिंदे याचे गाडीत बसलेल्या एका पॅसेन्जरने गाडीचे भाडयाचे पैसे न देता,तो पॅसेन्जर तसाच लोहगाव नागरी विमानतळाचे आत गेल्याने,सदर पॅसेंजरकडुन भाडयाचे पैसे घेण्याकरीता,सुधीर शिंदे याने त्याचा मालक सुमित मालुसरे याचे कडुन त्याचे नावाचे बनावट इंडिगो एअरलाईन्सचे तिकिट वॉट्सअपद्वारे त्याचे मोबाईलवर प्राप्त करुन,सदर बनावट विमानाचे तिकिटाद्वारे लोहगाव नागरी,विमानतळ येथे जाणुन-बुजुन बेकायदेशीररित्या प्रवेश केला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सी.एस.चौधरी ८९८३७७३८४० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ५७/१९,भादविक ३८०,३४ |
| **फिर्यादी** | जोगेश चौधरी,वय-२१,रा.हमालनगर,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | अंदाजे २३ ते २६ वर्षे वयाचे तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०२/२०१९ रोजी २०/०० वा. ते दि.१०/०२/२०१९ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान कुमार पार्क सोसायटी,बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नातेवाईकाचे मालकीचे गंगाधाम चौक मार्केटयार्ड,पुणे येथे ‘‘एस.गिफ्ट’’ नावाचे दुकान असुन,ते दुकानात हजर असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे दुकानात येवुन,त्यांना एका इसमाने दुकानाचे बाहेर बोलावुन,इतर इसमांनी बोलण्या मध्ये गुंतवुन,दुकानातील एका इसमाने गल्ल्यातील रक्कम चोरी करीत असताना दिसला. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास पकडण्याचा प्रयत्न केला. सदर इसमाने दुकानाचे गल्ल्यातील १० हजार रूपये रोख रक्कम चोरी करून पळुन गेले आहेत. (फिर्यादी यांनी त्यांचे दुकानाचे मालक यांचेशी विचारविनिमय करून आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.ए.खटके ९५५२७२१७२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**